मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत



# मंदिराचा एक पुढारी येशूची भेट घेतो

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus

रूपान्तरकार: M. Maillot; Sarah S.

Alastair Paterson

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2020 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

एके दिवशी येशू जेंव्हा मंदिरात गेला तेंव्हा लोक परमेश्वराच्या नावाचा अपमान करित आहे असे येशूने पाहिले. ते मंदिराच्या आंतमध्ये प्राण्यांची विक्री करीत होते तसेच चलन बदली करीत होते. (पैशांची अदलाबदल करत होते).



तेंव्हा त्याने दोऱ्यांचा एक चाबूक बनवून, खरेदी–विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांना मंदिरातून हाकलून लावले. "हि येथून काढून घ्या; माझ्या पित्याच्या घराची बाजारपेठ करु नका" अशी त्याने आज्ञा केली. येशूने त्याच्या पित्याच्या घरावर प्रीति केली.





मंदिरातून व्यापाऱ्यांना घालवून देण्याचा येशूकडे काय अधिकार आहे याचे चिन्ह दाखविण्यास अधिकाऱ्यांनी येशूला सांगितले. येशूने त्यांना उत्तर दिले, "तुम्ही हे मंदिर मोडून टाका, आणि मी तीन दिवसांत ते उभारीन." अशक्य! हे मंदिर बांधण्यास ४६ वर्षे लागली.

परंतू येशू तर त्याच्या
शरीराविषयी बोलला होता.
मंदिराप्रमाणेच, त्याचे शरीर देखिल
देवाचे राहण्याचे ठिकाण आहे. येशू
जरी वधस्तंभावर मरण पावणार
तरी देव पिता तिसऱ्या दिवशी
त्याला मरणातून जिवंत करणार
हे त्याला माहित होते.





रात्रीच्या वेळी, मंदिराच्या पुढाऱ्यांपैकी एकाने येशूची भेट घेतली. येशू हा देवाने पाठविलेला आहे हे चमत्कारांमुळे त्याला कळून आले होते. निकदेम देवाविषयी अधिक शिकण्यासाठी येशूकडे आला.



येशूने निकदेमला म्हटले की, देवाच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी लोकांनी नविन जन्म घेणे आवश्यक आहे. त्याला हे कळले नाही, तो म्हणाला, "म्हातारा झालेला मनुष्य कसा जन्म घेऊ शकेल?" निकदेम धार्मिक प्रवृत्तीचा मनुष्य होता, हे पुरेसे नव्हते काय?



येशूने उत्तर दिले,
"आत्म्यापासून जन्मलेले
आत्मा आहे." "देवाचा
आत्मा असाच आहे.
लोकांना वारा दिसत
नाही किंवा तो त्यांना
कळत नाही. वारा काय
करतो केवळ त्याचे कार्य
दिसते."



फार वर्षांपूर्वी इस्त्राएल लोकांनी मोशेच्या विरुध्द् तक्रार केली होती, "आम्हांला खाण्यासाठी अन्न नाही, पाणी नाही, आणि जे अन्न परमेश्वर देतो ते आम्हांला आवडत नाही," याप्रकारे त्यांनी ओरड केली होती त्याची निकदेमला येशूने आठवण करुन दिली.

लोकांच्या पापामुळे परमेश्‍वराला राग आला. त्याने त्यांच्यात आग्ये साप पाठविले. ते साप लोकांना चावले व त्यांच्यातील पुष्कळ लोक मरण पावले.



"आम्ही पाप केले आहे. देवाने साप काढून
टाकावे अशी देवाकडे प्रार्थना करा,"
यापकारे लोकांनी मोशेला विनंती केली.
म्हणून मोशेने त्यांच्यासाठी प्रार्थना केली.
परंतू देवाने साप काढून टाकले नाही.





एक आग्या साप तयार करुन उंच खांबावर टांगावा, असे परमेश्वराने मोशेला सांगितले. "ज्या प्रत्येकास आग्ये साप चावा घेतील ते जेंव्हा खांबावर टांगलेल्या या सापाकडे पाहतील तेंव्हा ते वाचतील." असे देवाने वचन दिले. मोशेने तांब्याचा साप बनविला आणि ज्यांनी कोणी त्याच्याकडे पाहिले ते सर्व बरे झाले.


येशूने निकदेमला म्हटले, जसा तांब्याचा
साप उंच केला होता तसे मनुष्याच्या
पुत्रालाहि उंच केले पाहिजे. पापासाठी
येशू जेथे मरणार होता त्या
वधस्तंभाविषयी
येशू बोलला.


येशूने म्हटले, "देवाने जगावर एवढी प्रीति
केली की, त्याने आपला एकुलता एक
पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी
त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा
नाश होऊ नये तर त्याला
सार्वकालिक जीवन
प्राप्त व्हावे."


याचा अर्थ असा की, जो कोणी
येशूवर विश्वास ठेवतो त्याचा
देवाच्या कुटुंबात जन्म
झाला आहे.

कदाचित त्या रात्री निकदेम येशूचा शिष्य बनला नसेल. परंतु काही वर्षांनंतर,
वधस्तंभावर खिळलेल्या मनुष्याच्या पुत्राला कबरेत पुरण्यासाठी मदत
करण्याच्याव्द्ारे तो येशुवर प्रीति करित होता
व त्याच्यावर विश्वास करित होता
हे त्याने दाखवून दिले.



यानंतर, येशू व त्याचे शिष्य उत्तरेकडे प्रवासाला निघाले. इतर लोकांना देखिल देवाच्या राज्याविषयी ऐकण्याची आणि नासरेथकर येशू जो देवाचा पुत्र याच्यावर विश्वास करण्याची संधी मिळणे आवश्यक होते.



# मंदिराचा एक पुढारी येशूची भेट घेतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

योहान २–३, गणना २१

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला!   योहान 3:16